e-news letter

# e जलसेवा Bulletin

Enabling efficient water management
कार्यक्षम जलव्यवस्थापनासाठी

Volume : III Issue : 12 April 2014

Government of Maharashtra
Water Resources Department

• Editor •
T. N. Munde

• Executive Editor •
Sharad Dabhadkar

• Editorial Board •
Mrs. Purnima Desai  Mr.Prashant Kadam
Mrs. Dhanashree Limaye  Mr.Avinash Patil

**Our Vision** *Transform WRD into modern & service driven department through Information & Communication Technology*

## संपादकीय



**ई–जलसेवा १.१ ची सुधारित आवृत्ती एप्रिल २०१४ पासून आपणा सर्वांना उपलब्ध करून देतांना तसेच पाहता पाहता ई–बुलेटीन पुढील महिन्यात चौथ्या वर्षात पदार्पण करीत असल्याचा मनस्वी आनंद होत आहे. ई–प्रशासन प्रकल्पांतर्गत केलेली माहिती व्यवस्थापन प्रणाली CA Clarity १२.१ मध्ये विकसित केली आहे. संगणक/आज्ञावली क्षेत्रात निरंतरपणे सुधारणा होत असते. ई–जलसेवा १.१ ची सुधारीत आवृत्ती हा त्याचाच एक भाग आहे. या संबंधी माहिती देणारे लेख मागील अंकात तसेच याही अंकात सुलभ संदर्भाकरीता माहिती मराठीतून देण्यात येत आहे. या नवीन आवृत्तीमुळे ई–जलसेवा प्रणालीचा वापर अधिक सुकर व हाताळण्यास अतिशय सोपा होणार आहे. हे सर्व साध्य करण्यासाठी PMO कार्यालयातील प्रत्येक सदस्याने अहोरात्र मेहनत केली आहे.**

**मार्च १४ मध्ये दोन्ही मा. प्रधान सचिवांनी सर्व मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांचा महामंडळ निहाय आढावा घेवून केलेल्या प्रगतीची पाहणी केली. मागील काही महिन्यात प्रणालीत माहिती भरणे व माहितीची पडताळणी करण्याच्या कामाने अपेक्षित वेग घेतला आहे. मा. प्रधान सचिवांनी याबाबत समाधान व्यक्त करून आता प्रणालीत भरलेल्या माहितीचा वापर दैनंदिन कामात अधिकाधिक करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. हे सर्व वरीष्ठ अधिकाऱ्यांनी प्रणालीबाबत दाखविलेल्या विश्वासामुळे शक्य झाले आहे. महत्त्वाचे म्हणजे सर्वच स्तरांवर आता ई–जलसेवा हा दैनंदिन कामकाजाचा भाग होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. ही बाब खरोखरच आमचा उत्साह वाढविणारी आहे.**

उपअभियंता संवर्गाचे प्रशिक्षण यापुढे उपअभियंता संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांना शासन परिपत्रक दिनांक २०/३/२०१४ नुसार अनिवार्य.

म.अ.प्र.प्र., नाशिक यांचेकडून एप्रिल २०१४ पासून नियमितपणे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत आहे. मंडळनिहाय उपअभियंता संवर्गातील अधिकाऱ्यांची माहिती म.अ.प्र.प्र., नाशिक कार्यालयास पाठवावी.

## प्रणालीत भरलेल्या माहितीचा वापर

ई–जलसेवा प्रणालीमध्ये आता मुख्य मोड्यूलमध्ये मोठ्या प्रमाणात माहिती भरण्यात आलेली आहे. उर्वरित माहिती भरण्याचे व त्याच्या पडताळीचे काम होत आहे. या अनुषंगाने भरलेल्या माहितीचा वापर करण्याविषयी निवडक मास्टर ट्रेनर्ससाठी नुकतीच एक कार्यशाळा कोयना संकल्पचित्र मंडळ येथे घेण्यात आली त्या दृष्टिने प्रणालीमधून आपल्या दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक माहिती प्रत्येक कार्यालयास मिळविता आली पाहिजे, हा या कार्यशाळेचा उद्देश होता. कार्यालयाच्या उतरंडीतील प्रत्येक टप्प्यावर कनिष्ठ कार्यालयाकडून माहिती मागविण्याचा अट्टाहास सोडायला हवा. परंतु हे साध्य होण्यासाठी खालील बाबींची अंमलबजावणी करणे नितांत गरजेचे आहे.

१. प्रणालीमधील माहिती पूर्णपणे (१००%) भरलेली असली पाहिजे.
२. भरलेल्या माहितीच्या अचूकतेविषयी पडताळणी झालेली असणे.
३. प्रणालीमधून आवश्यक ती माहिती मिळविण्यासाठी लागणारे कौशल्य/क्षमता कार्यालयातील निवडक अधिकाऱ्यांकडे विकसित केलेले असणे.

माहिती मिळविण्यासाठी प्रणालीमध्ये उपलब्ध असणारे खालील पर्याय वापरता येतील.

(१) विविध डॅशबोर्डस्, (२) प्रत्येक मोड्यूलमधील Portlet अहवाल, (३) प्रत्येक मोड्यूलमधील Crystal अहवाल, (४) क्लॅरिटी मधील Configure ऑप्शन, (५) 'पॉवर फिल्टर' ऑप्शन, (६) स्वत:साठी लागणारी पोर्टलेट स्वत: तयार करण्यासाठी My Portlets ऑप्शन, (७) प्रत्येक अधिकाऱ्यास आपल्या गरजेप्रमाणे लागणारा स्वत:चा Dashboard (८) Export to excel ऑप्शन व त्यानुसार Pivot table इ.चा वापर.

वरील पर्यायांचा वापर करून प्रणालीमधून आपणास योग्य अशा निष्कर्षापर्यंत पोहचण्यासाठी उपयुक्त माहिती तांत्रिक व सहाय्यकारी मोड्युलद्वारे मिळविता येईल.

नेहमीच्या पद्धतीमध्ये पडताळणी करणे शक्य नसणाऱ्या अनेक मुद्द्यांची तपासणी प्रणालीमधून करता येईल. उदा. : एखाद्या ठेकेदाराकडे आजमितीस संपूर्ण महाराष्ट्रातील असणारी Work in Hand ची यादी व त्यावरील मशिनरी. निविदा प्रक्रियेमधील Prequalificaion मध्ये लागणाऱ्या विविध मुद्द्यांची माहिती प्रणालीमधून अचूक व संकलित स्वरूपात मिळेल. अशाचप्रकारे न्यायालयीन प्रकरणे, मालमत्ता व्यवस्थापन इ. मोड्यूलचाही वापर कार्यक्षमता वाढविण्यासाठी यापुढे क्रमप्राप्त ठरणार आहे.

**प्रणालीमधील माहितीची उपयुक्तता हाच प्रणालीच्या निरंतर वापरासाठीचा गाभा आहे, हे विसरता कामा नये.** कार्यालयांच्या प्रत्येक टप्प्यांवरील पातळीवर संकलित स्वरूपातील अचूक माहिती लगेच उपलब्ध होणे हा प्रणालीचा सर्वांत मोठा फायदा आहे. परंतु त्यासाठी लागणारे आवश्यक कौशल्य आत्मसात करणे सर्वांना गरजेचे आहे. भविष्यात लोकप्रतिनिधींकडून आलेल्या विविध प्रश्नांना आपले वरील अधिकारी आत्मविश्वासपूर्वक अचूक उत्तर तत्परतेने देवू शकतील, यात शंका नाही.

# ई–जलसेवा १.१ आता नव्या स्वरुपात

## चला तर प्रत्यक्ष वापरून पाहू या !!

जलसंपदा विभागाच्या ई–जलसेवाची (आवृत्ती १.१) आता सुधारीत स्वरुपात कार्यान्वित

मुख्यत: फ्रंटपेजच्या पार्श्वभूमीची रंग संगती अधिक आकर्षक व उठावदार केली आहे.

अक्षरांचा आकार मोठा केला असून वापरकर्त्याचे नाव उजव्या कोपऱ्यात वरच्या बाजूस सतत दिसत राहील.

पडद्यावर मेनू बारची अनावश्यक गर्दी टाळून अधिक मोकळी जागा मुख्य कामासाठी मिळावी अशी रचना करण्यात आली आहे. Home व Favorites ही दोनच बटणे पडद्यावर वरच्या बाजूस दिसतील.

मोड्यूल्सची यादी दिसत नाही म्हणून गोंधळून जावू नका. Home या बटणावर क्लिक केल्यास सर्व मोड्यूल्स आडव्या रांगेत दिसतील. पाहिजे त्या नेमक्या मोड्यूल मध्ये जाण्यासाठी Previous / Next बटण वापरा.

जुन्या आवृत्तीमध्ये अनेकांना नेमके मोड्यूल लांबलचक यादीतून शोधणे प्रत्येक वेळी त्रासदायक वाटत होते. आता हा त्रास वाचविला आहे Favorite या बटणाने ! आपल्याला नेहमी लागणाऱ्या मोड्यूल मधील नेमक्या लिंक्सची छोटी यादी आपण Favorite मध्ये Add करुन ठेऊ शकतो. Favorite मध्ये निवडलेल्या लिंक्स वर क्लिक करुन त्याद्वारे आपण सरळ त्या मोड्यूल्सच्या लिंकवर जाऊ शकतो.

अरेच्या ! मोड्यूल्सच्या सबलिंक्स ची यादीच दिसत नाही कुठे ! क्षणभर थांबा Properities दिसतंय ना ! त्यावर क्लिक करा. सगळ्या सबलिंक्स दिसायला लागतील.

मागच्या पानावर जायचंय ?? वरच्या डाव्या कोपऱ्यातील Back [◄] चा बाण वापरा.
आणि हो, त्याही आधी भेट दिलेल्या Pages वर जायचंय, तर Recent Pages [▼], चा बाण वापरा.

Search option आता अधिक सोपं झालय, 'Auto suggest' वैशिष्ट्यामुळे ! Browse फिल्ड मध्ये सुरुवातीची फक्त चार अक्षरे जरी टाईप केली की त्या अक्षरापासून सुरु होणारी सर्व यादी दिसेल !

अनेकदा फिल्टर सेक्शन मध्येच माहिती भरायला सुरु केल्याचा अनुभव आपण घेतला असेल. आता Filter Section वापरणे अधिक सोपे झालेय +/– अर्थात (expand/collapse) बटणाने, फिल्टर हवे तेंव्हाच '+' वर क्लिक करुन उघडा व नको असेल तेव्हा '–' वर क्लिक करुन बंद करा.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे फॉर्मच्या एखाद्या फिल्ड मधील माहिती बदलण्यासाठी आता फॉर्म प्रत्यक्ष न उघडताही List View मध्येच ती बदलता येईल (In line Editing) !

याशिवाय इतरही अनेक वैशिष्ट्यांसह ई–जलसेवा आता बनले आहे हाताळण्यास अधिक सोपे !



## एम २४ मोड्युलमध्ये माझा खारीचा वाटा

सौ.दीपाली सोनावणे, कनिष्ठ लिपीक



ई-जलसेवा अंतर्गत माहिती व व्यवस्थापन प्रणालीमध्ये एम-२४ हे मासिक लेखा विषयक महत्त्वाचे मोड्यूल आहे. गेल्या काही महिन्यांपासून या मोड्यूलमध्ये लेखाविषयक काम करण्याची जबाबदारी दिली होती. हे मोड्यूल विकसित करताना मंत्रालयीन वरिष्ठ अधिकारी मे. विप्रो, महालेखाकार नागपूर यांचे अधिकाऱ्यांसमवेत अनेक वेळा चर्चा व बैठका झाल्या व हे मोड्यूल विकसित केले गेले. स्वत: महालेखाकार, नागपूर हे कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे येथे येऊन आढावा घेतला. यावरूनच या मोड्यूलचे महत्त्व अधोरेखित होते. प्रथमत: महालेखाकार यांना लागणारे ५ महत्त्वाचे फॉर्म ऑनलाईन पाठविण्याचे ठरले. मी या कामासाठी कार्यालयात व घरीही तासन्तास काम केले व हे काम आता पूर्ण झाल्याने कर्तव्यपूर्तीचा आनंद मिळाला व तो शब्दात व्यक्त करता येत नाही. त्याचप्रमाणे HOW e-JEE कार्यशाळेत कार्यकारी अभियंत्यांना एम-२४ मोड्यूल विषयी माहिती देण्याची संधी मिळाली.

महाराष्ट्रातील सर्व विभागांना ऑनलाईन लेखा सादर करण्यासाठी त्यांच्या अडचणी सोडविल्या व पाठपुरावा केला आहे व आता जवळपास सर्व विभागाचा लेखा ऑनलाईन सादर केला जात आहे. मला या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात खारीचा वाटा उचलण्याची संधी दिल्याबद्दल मी मनोमन सर्व अधिकाऱ्यांना धन्यवाद देते!

## क्षणचित्रे



मा.श्री.एकनाथ पाटील, प्रधान सचिव (जसं)
यांची पुणे येथील आढावा बैठक (दि. १४ मार्च २०१४)



मा.श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव (लाक्षेवि)
यांची पुणे येथील आढावा बैठक (दि. २४ व २५ मार्च २०१४)



HOW e-JEE कार्यशाळा, म.अ.प्र.प्र., नाशिक (दि. १२ ते १५ मार्च २०१४)



ई-जलसेवा १.१ व प्रणालीचा वापर यासंबंधीची १ दिवसीय कार्यशाळा
(पुणे, दि. २८ मार्च २०१४)

## ई-जलसेवा वृत्तांत

1. eJalseva project review by Hon. Principal Secretary (WR) on 14/3/2014 at KDC, Pune. All the CEs presented circle wise data entry and validation status of 11 modules.
2. eJalseva project review by Hon. Principal Secretary (CADA) on 20th, 21st and 24th & 25th March 2014 at Nashik, Aurangabad and Pune respectively.
3. Both the Secretaries appreciated the efforts and hard work done by all field officers and expected the same to be completed till first week of April
4. New look and feel is available for portal as well as CA Clarity with user friendly features.
5. Mr Ugile, Chief engineer, PWD visited PMO on 1/3/2014 for eJalseva project demonstration & interaction on e-Governance project of PWD.
6. Data entry in modules M6, M16, M28 & M29 target timelines set.
7. STeDE Training mandatory to DEs & to be completed in 2014-15 at META (GR Published)

## Be an ICIS e-news author......

We at ICIS e-news letter offer an opportunity to our readers to contribute articles and be a part of a family of ICIS e-news author. In particular, we will appreciate receiving contributions on articles bearing on innovative approach in e-governance, development and use of software in day to day department activities.

